# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 25.06.2025** **वार- बुधवार**

---

**<u>आबा</u>**

देशात 25 जून 1975 रोजी आणीबाणी लागू करण्यात आली होती, या घटनेला आज 50 वर्ष पूर्ण होत असल्याबद्दल पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्यावतीनं कार्यालयाच्या तळमजल्यावर आयोजित विशेष प्रदर्शनाचं जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्या हस्ते आज उद्घाटन करण्यात आलं. आणीबाणी कालावधीत बंदिवास सोसलेल्या व्यक्तींना जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरुपात सन्मानपत्र प्रदान करण्यात आलं. या ज्येष्ठ व्यक्तींनी दिलेल्या ‘भारत माता की जय’ , ‘वंदे मातरम’ घोषणांनी जिल्हाधिकारी कार्यालय परिसर दुमदुमला. या प्रदर्शनात भारताच्या प्राचीन कालखंडापासून टप्प्या- टप्प्यानं विकसित झालेली लोकशाही परंपरा, स्वातंत्र्योत्तर भारत आणि संसदीय प्रणाली, आणीबाणीपूर्व आणि आणीबाणी कालावधीत घडलेल्या घडामोडी आदी माहितीचं सादरीकरण करण्यात आलं आहे. जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीनं संयोजित हे प्रदर्शन 25 जुलैपर्यंत नागरिकांना पाहता येईल.

**<u>दूध</u>**

राज्यात दूध भेसळ रोखण्यासाठी लवकरच नवा कायदा अस्तित्वात येईल, अशी माहिती दुग्धविकास मंत्री अतुल सावे यांनी दिली आहे. दुग्धविकास विभागाच्या १५० दिवसांच्या आराखड्याच्या अनुषंगानं नुकतीच पुण्यात आयोजित बैठकीत ते बोलत होते. राज्यात दुधाला समान दर, एक राज्य एक ब्रँड, एक जिल्हा एक दूध संघ, तसंच एक गाव एक दूध संस्था स्थापन करण्याची मागणी प्रतिनिधींनी केली. त्यावर

सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असं आश्वासन सावे यांनी दिलं. या वेळी दुग्धविकास विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन., महानंदचे व्यवस्थापकीय संचालक अनिल हातेकर यांच्यासह राज्यातील प्रमुख दूध संघांचे प्रतिनिधी, विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**मिकर**

पुणे महापालिकेचा मिळकतकर भरताना सवलत मिळविण्यासाठी सहा दिवस बाकी राहिले असून आतापर्यंत महापालिकेकडं  ९३२ कोटी रुपये मिळकतकर  जमा झाला आहे. ३० जूनपर्यंत मिळकतकराची रक्कम भरणाऱ्या मिळकतदारांना बिलात पाच ते दहा टक्के सवलत दिली जाणार आहे. चालू आर्थिक वर्षामध्ये मिळकतकर विभागाला ३ हजार २५० कोटी रुपयांचा महसूल गोळा करण्याचं उद्दिष्ट देण्यात आलं आहे. आतापर्यंत ५ लाख ७९ हजार ५८८ जणांनी कर जमा केला आहे.

**सिंहउपु**

सिंहगड रस्त्यावरील उड्डाणपुलाची एक बाजू  पुणे महापालिकेनं वाहतुकीसाठी खुली केली आहे. मात्र, दुसरी बाजू वाहनचालकांसाठी सुरू करण्यास गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळं उशीर होत आहे. हे काम पूर्ण होण्यासाठी किमान दीड महिन्यांचा वेळ लागणार आहे. सिंहगड रस्त्यावरील उड्डाणपुलाच्या कामाला महापालिकेच्या भवन विभागानं सप्टेंबर २०२१ मध्ये सुरुवात केली. सुमारे अडीच किलोमीटर लांबीचा हा पूल आहे.

**नाटकावर**

मराठी नाटकांचा प्रेक्षक देशभरात सर्वाधिक प्रगल्भ असल्याचं मत नाट्य क्षेत्रातील मान्यवरांनी पुण्यात बालगंधर्व रंगमंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित बालगंधर्व महोत्सवात आज 'नाटकावर बोलू काही' या मुक्तसंवादात व्यक्त केलं. या कार्यक्रमात पत्रकार आणि समीक्षक राज काझी यांनी जेष्ठ दिग्दर्शक

विजय केंकरे, चंद्रकांत कुलकर्णी आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष, अभिनेते आणि निर्माते प्रशांत दामले यांच्याशी संवाद साधला.

महाराष्ट्रात पूर्वीपासून सामाजिक, साहित्यिक आणि सांगितीक चळवळी फार मोठ्या प्रमाणावर झाल्या. या चळवळीमुळं महाराष्ट्रातील नाटकांचा प्रेक्षक हा अधिक प्रगल्भ बनला, असं मत चंद्रकांत कुलकर्णी यांनी व्यक्त केलं. महाराष्ट्र आणि बंगाल वगळता उर्वरित देशभरात आजही नाटकांचे विषय प्रामुख्याने रामायण, महाभारत आणि पुराणे यांच्यातील प्रसंगांवर आधारित असतात. महाराष्ट्रात मात्र वैविध्यपूर्ण विषयांवर मोठ्या प्रमाणावर नाटकं सादर केली जात आहेत, याकडे विजय केंकरे यांनी लक्ष वेधलं.

<u>डेंग्यू</u>

पुणे  शहरात पावसाळ्यामुळं कीटकजन्य आजारांचा धोका वाढला आहे. जूनमध्ये डेंग्यूच्या संशयित रुग्णांची संख्या ५९ वर पोहोचली आहे. या वर्षभरात डेंग्यूचे एकंदर १८९ संशयित आणि ८ निदान झालेले रुग्ण आढळले आहेत अशी माहिती महापालिकेच्या आरोग्य विभागानं दिली. शहरातील मागील ३ वर्षांतील कीटकजन्य आजारांचा उद्रेक झालेल्या भागांवर आरोग्य विभागानं अधिक लक्ष केंद्रित केले आहे. या ठिकाणी औषध फवारणी करण्यात येत आहे. गेल्या वर्षी जास्त रुग्णसंख्या आढळून आलेल्या भागात साथरोग प्रतिबंधक उपाययोजनांवर भर देण्यात आला आहे. पावसाळ्याच्या तोंडावर संभाव्य पूर नियंत्रण आराखड्यामधील पाणी साचणाऱ्या ठिकाणी औषध फवारणीचं नियोजनही करण्यात आलं आहे, असं सहायक आरोग्य अधिकारी डॉक्टर राजेश दिघे यांनी सांगितलं.

<u>तायक्वांदो</u>

देहरादून  इथं आयोजित पाचव्या कॅडेट राष्ट्रीय तायक्वांदो अजिंक्यपद स्पर्धेत पुणे जिल्हा संघानं फ्रीस्टाईल पुमसे प्रकारात रौप्य पदक पटकावलं. ही स्पर्धा इंडिया तायक्वांदोनं आयोजित केली होती. पुण्याकडून तनय दूत,आरव वात्याणी, सोहम नाईक, राही सावंत, लावण्या जाडे, प्रीषा चौधरी या खेळाडूंनी विजयात

मोलाचा वाटा उचलला. हे खेळाडू पुणे जिल्ह्याचे प्रशिक्षक रोहन बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेत आहेत.

पुणे आणि परिसरात उद्या आकाश साधारण ढगाळ राहून पावसाच्या हलक्या सरी पडण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**